माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /१११९/२०२४ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| उमेश ज्ञानू मंडले | शिरस्तेदार (सर्वसाधारण १) भूमापन १,उपसंचालक भूमी अभिलेख पुणे प्रदेश, पुणे | कार्यालय अधीक्षक उपसंचालक भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे |

**(सुनावणी दिनांक- १६ .०९. २०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.१२.०२.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये आदेश देऊनही माहिती मिळाली नाही असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १६.११.२०२३ | श्री. सूर्यकांत मोरे यांनी सांगोल्यातील भूमी अभिलेख कार्यालयाची तपासणी करुन आपल्याकडे सादर केलेल्या अहवालाची प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, “ अपिल आदेशानंतर तपासणी पथकाचा अहवाल पूरविला आहे.”

उपलब्ध अभिलेखावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०१.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये माहिती पूरविण्याचे आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केलेला अहवाल विनामूल्य देऊन त्यांची दि. १२.०२.२०२४ या तारखेची पोहोच प्राप्त केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /१११९/२०२४ /पुणे 11197 दिनांक - 29/09/25

रामाआ-पुणे/२०२५/NSB